# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ५७३ /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांक:- २५/१०/२०१८


## “स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचे जयंती निमीत्त व शहिद पोलीस जवानांचे स्मृती प्रित्यर्थ भंडारा जिल्हा पोलीस दला तर्फे एकता दौड व सद्भावणा दौड चे आयोजन”

**दिनांक ३१/१०/२०१८ रोजी पहाटे ५.०० वा. संपन्न होणार.**

भंडारा :- दिनांक ३१/१०/२०१८ रोजी स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचे जयंती निमीत्त व शहिद पोलीस जवानांचे स्मृती प्रित्यर्थ भंडारा जिल्हा पोलीस दला तर्फे एकता दौड व सद्भावणा दौड चे आयोजन दिनांक ३१/१०/२०१८ रोजी करण्यात आले आहे. भंडारा शहरातील व जिल्हयातील तमाम नागरीकांनी एकता दौड व सद्भावणा दौड मध्ये सामील होण्याचे आवाहन श्रीमती विनीता साहू मा. पोलीस अधीक्षक, जिल्हा भंडारा व भंडारा जिल्हा पोलीस दला तर्फे करण्यात येत आहे. दिनांक ३१/१०/२०१८ रोजी सकाळी ५.०० वा. कवायत मैदान पोलीस मुख्यालय भंडारा येथुन प्रमुख पाहुण्यांचे हस्ते हिरवी झेंडी दाखवुन एकता दौड व सद्भावणा दौड सुरू होणार असुन यामध्ये १८ वर्षा वरील पुरूष खुला गट हे १० कि.मी. करीता नांव नोंदणी करू शकतात. त्याकरीता त्रिमुर्ती चौक - बसस्टॅड - गांधी चौक - शास्त्री चौक - शासकीय तंत्रनिकेतन - गणेशनगर ले आउट तेथुन परत त्याच मार्गे पोलीस मुख्यालय अशी मार्गीका ठरवण्यात आली आहे. १८ वर्षा वरील महिला खुला गट हे ५ कि.मी. करीता नोंदणी करू शकतात. त्याकरीता पोलीस मुख्यालय त्रिमुर्ती चौक - शास्त्री चौक - आयएमए हॉल व तेथुन त्याच मार्गे पोलीस मुख्यालय परत अशाप्रकारे मार्गीका ठेवण्यात आली आहे. पोलीस अधिकारी व कर्मचारी ३ कि.मी. एकता दौड करीता नांव नोंदणी करू शकतात. त्यांचेकरीता पोलीस मुख्यालय त्रिमुर्ती चौक - शास्त्री चौक व तेथुन पोलीस मुख्यालय परत अशा पध्दतीने मार्गीका आखण्यात आलेली असुन नागरीकांना/स्पर्धकांना नाव नोंदणी करण्याकरीता स्पर्धक पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा संपर्क क्रमांक ०७१८४-२५२४००, पोलीस स्टेशन भंडारा संपर्क क्रमांक ०७१८४-२५२३०३ येथे कधीही तर चैतण्य व्यायाम शाळा पोलीस मुख्यालय भंडारा या ठिकाणी सकाळी ०६.०० ते १०.०० व संध्याकाळी १७.०० ते १९.०० या वेळेत नोंदणी करू शकतात त्याच प्रमाणे व्हॉट्सअॅप क्रमांक ९४०५८३११०० व भंडारा पोलीसांचे अधिकृत फेसबुक व ट्वीटर अकाउंटवर नांव नोंदणी करू शकतात. विजयी उमेदवारांना मान्यवरांचे हस्ते प्रथम, द्वितीय व तृतीय पारीतोषीके व प्रशस्तीपत्रके देण्यात येतील.

तरी जास्तीत जास्त संख्येने नागरीकांनी एकता दौड व सद्भावणा दौड मध्ये सहभागी व्हावे असे आवाहन भंडारा जिल्हा पोलीस दला तर्फे करण्यात येत आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय,भंडारा
संपर्क क्र. ०९४०३१०९७२०

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.